| योजनेचे नाव | "सरसेनापती संताजी घोरपडे उद्योजकता विकास (इनक्युबेशन) उपक्रम" |
|---|---|
| योजनेची सुरुवात | सन २०२४-२५ |
| लाभार्थी लक्षांक | मागणी प्रमाणे निधी उपलब्धता विचारात घेऊन मा. संचालक मंडळाच्या मान्यतेने वार्षिक लक्षांक निश्चित केला जातो. |
| योजनेचा उद्देश | सारथी संस्थेमार्फत “सरसेनापती संताजी घोरपडे सारथी उद्योजकता विकास (इनक्युबेशन) उपक्रम” सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा या लक्षित गटातील नवोदित तरुण विद्यार्थी आणि नवउद्योजकांना त्यांच्या स्टार्टअप कल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी व्यावसायिक मार्गदर्शन व विद्यावेतन स्वरूपात आर्थिक सहाय्य दिले जाते. |
| योजनेचे स्वरूप | “सरसेनापती संताजी घोरपडे उद्योजकता विकास (इनक्युबेशन) उपक्रम” अंतर्गत नवव्यवसाय प्रकल्पाच्या व्यवसायिक गुणवत्ता वाढीसाठी लक्षित गटातील नवउद्योजक, विद्यार्थ्यांना संशोधनावर आधारित आणि नव संकल्पना आधारीत उद्योग निर्मिती करण्यासाठी एक वर्षासाठी इनक्युबेशन केंद्राकडे प्रायोजित केले जाते. यामध्ये सारथी संस्थेकडून लाभार्थ्यांना विद्यावेतन स्वरुपात रु. २५००० प्रती महिना प्रती विद्यार्थी अर्थ सहाय्य एका वर्षासाठी प्रगतीच्या टप्यानुसार अदा केले जाते. तसेच इनक्युबेशन केंद्रांकडून स्टार्ट-अप यशस्वी होणेसाठी आवश्यक प्रशिक्षण, तज्ञांकडून मार्गदर्शन, भौतिक संसाधने उदा. कार्यालयीन जागा, मिटींग हॉल इ. बाबी उपलब्ध करुन देण्यात येतात. त्याची रक्कम रु.५००० प्रती विदयार्थी प्रती महिना सारथी संस्थेकडून इनक्युबेशन केंद्रांना दिली जात आहे. |
| प्रशिक्षण ठिकाण | महाराष्ट्रातील शासनमान्य यादीपैकी १३ इनक्युबेशन केंद्रांनी सारथी संस्थेसोबत सामंजस्य करार स्वाक्षरीत केला आहे त्यांची नावे पुढीलप्रमाणे COEP BHAU Institute, MAGIC |

| | |
|---|---|
| | Incubatin centre छत्रपती संभाजीनगर, Shivaji Centre for Innovation, Incubation and Linkages कोल्हापूर, NETRARIT Foundation सांगली, G H Raisoni Technology Business Incubator Foundation नागपूर, Uddyam-Solapur University Incubation Centre सोलापूर, SPPU Research Park Foundation पुणे, AIC MIT ADT Incubation Centre लोणी काळभोर, AIC IISER Pune SEED Foundation (AIC-SEED) पुणे, Atal Incubation Centre – Agriculture Development Trust (AIC-ADT) बारामती पुणे, AIC-BAMU Foundation - Atal Incubation Centre छत्रपती संभाजीनगर, Foundation of Market Happen Centre for Invention, Innovation and Incubation (FMCIII) पुणे, IIMN Foundation For Entrepreneurship असे १३ इनक्युबेशन केंद्रांचा समावेश आहे. |
| **प्रशिक्षण ठिकाण** | महाराष्ट्रातील शासनमान्य यादीपैकी १३ इनक्युबेशन केंद्रांनी सारथी संस्थेसोबत सामंजस्य करार स्वाक्षरीत केला आहे त्यांची नावे पुढीलप्रमाणे COEP BHAU Institute, MAGIC Incubatin centre छत्रपती संभाजीनगर, Shivaji Centre for Innovation, Incubation and Linkages कोल्हापूर, NETRARIT Foundation सांगली, G H Raisoni Technology Business Incubator Foundation नागपूर, Uddyam-Solapur University Incubation Centre सोलापूर, SPPU Research Park Foundation पुणे, AIC MIT ADT Incubation Centre लोणी काळभोर, AIC IISER Pune SEED Foundation (AIC-SEED) पुणे, Atal Incubation Centre – Agriculture Development Trust (AIC-ADT) बारामती पुणे, AIC-BAMU Foundation - Atal Incubation Centre छत्रपती संभाजीनगर, Foundation of Market Happen Centre for Invention, Innovation and Incubation (FMCIII) पुणे, IIMN Foundation For Entrepreneurship असे १३ इनक्युबेशन केंद्रांचा समावेश आहे. |
| **प्रशिक्षण कालावधी** | या योजने अंतर्गत प्रशिक्षण कालावधी हा १ वर्षाचा आहे. |

| | |
|---|---|
| **लाभार्थी पात्रता** | १. अर्जदार हा महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी, या प्रवर्गातील असावा. (मराठा प्रवर्गातील उमेदवारासाठी शाळा सोडल्याचा दाखला व कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी या प्रवर्गासाठी सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेला जातीचा दाखला आवश्यक आहे.)<br>२. अर्जदार हा महाराष्ट्राचा कायम रहिवासी असावा.<br>३. अर्जदाराने यापूर्वी सारथी संस्थेकडून आर्थिक लाभ घेतलेला नसावा. अर्जदार किमान पदवीधारक असावा.<br>४. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ज्यामधे पालकांचे व कुटुंबातील सर्व सदस्यांचे वेतन व इतर स्त्रोत कडून मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा जास्त नसावे.<br>५. अर्जदाराचे नावाचे तत्सम वर्षाचे प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले उत्पन्न प्रमाण पत्र/नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र आवश्यक आहे. (शा.नि. क्र.१०/२००८ क्र. प्र./६९७-विभाजक/१, दि. १६/१२/२०१७)<br>६. अर्जदाराकडे स्वत:ची तंत्रज्ञान व्यवसाय कल्पना असावी व एका वर्षामध्ये त्याने त्याच्या कल्पनेचे रूपांतर स्केलेबल टेक्नॉलॉजी बिझनेस स्टार्टअपमध्ये करणे आवश्यक.<br>७. सारथी संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर अर्ज मागविण्यात येतील प्रत्येक इनक्युबेशन केंद्राच्या तज्ञ समिती समोर संकल्पना सादरीकरण व मुलाखतीद्वारे मंजूर जागांच्या मर्यादेत पात्र विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते . |

| | |
|---|---|
| **आवश्यक कागदपत्रे** | ✓ जन्म दाखला<br>✓ अधिवास दाखला<br>✓ जातीचा दाखला/शाळा सोडल्याचा दाखला/**EWS** प्रमाणपत्र (मराठा /कुणबी नोंद असणे आवश्यक)<br>✓ वार्षिक उत्पन्न दाखला/ **EWS** प्रमाणपत्र/नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र (वार्षिक उत्पन्न ८ लाख)<br>✓ आधार कार्ड,<br>✓ पासपोर्ट साईज फोटो<br>✓ स्वत:च्या नावे राष्ट्रीयकृत बँकेमध्ये खाते असलेले बँक पासबुक जे आधार कार्डाशी सलग्न असेल.<br>✓ पदवी प्रमाणपत्र |
| **लाभार्थी निवड प्रक्रिया** | सारथी संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर अर्ज मागविण्यात येतील प्रत्येक इनक्युबेशन केंद्राच्या तज्ञ समिती समोर संकल्पना सादरीकरण व मुलाखतीद्वारे मंजूर जागांच्या मर्यादेत पात्र विद्यार्थ्याची निवड करण्यात येते .<br>- अर्जदाराकडे स्वत:ची तंत्रज्ञान व्यवसाय कल्पना असावी व एका वर्षामध्ये त्याने त्याच्या कल्पनेचे रूपांतर स्केलेबल टेक्नॉलॉजी बिझनेस स्टार्टअपमध्ये करणे आवश्यक. |
| **लाभाचे स्वरूप** | ➢ या उपक्रमांतर्गत निवड झालेल्या नवउद्योजकांना एक वर्षासाठी रु. २५,००० प्रती महिना आर्थिक सहाय्य विद्यावेतन देण्यात येते.<br>➢ इनक्युबेशन केंद्रास व्यवस्थापन शुल्क रु.५०००/- दरमहा प्रती आसन (उमेदवार) देण्यात येत आहे. |
| **प्रशिक्षण संस्थेबाबत** | "सरसेनापती संताजी घोरपडे उद्योजकता विकास (इनक्युबेशन) उपक्रम" अंतर्गत १३ इनक्युबेशन केंद्रांच्या माध्यमातुन लक्षित गटातील उमेदवारांचे प्रशिक्षण कार्यक्रम सुरु आहे. यापैकी ०७ इनक्युबेशन केंद्रांचे प्रशिक्षण कार्यक्रम माहे ऑगस्ट २०२४ पासून सुरु झालेला आहे व उर्वरित ०६ नमूद इनक्युबेशन केंद्रांचे प्रशिक्षण कार्यक्रम माहे जानेवारी २०२५ सुरु झालेला आहे. |

| | |
|---|---|
| **अपात्रतेचे निकष** | योजनेचा आर्थिक लाभ घेण्यासाठी सारथी संस्थेने ज्या काही बाबी नमूद केल्या आहेत त्या बाबींची पूर्तता विद्यार्थ्याने करणे आवश्यक आहे. सदर नमूद बाबींची पूर्तता विद्यार्थी करू शकला नाही तर, तो सदर योजनेचा लाभ घेण्यास पात्र ठरणार नाही. |
| **२०२४-२५ लाभार्थी संख्या** | १२८ |